# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## वकील पॅनल नियुक्ती करीता जाहिरात

नाशिक महानगरपालिकेची मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा. जिल्हा न्यायालय व कामगार / औद्योगिक न्यायालय नाशिक मधील व इतर न्यायालयात विविध दिवाणी व फौजदारी न्यायालयीन प्रकरणे चालविण्सासाठी नाशिक महानगरपालिकेच्या पॅनलवर वकीलांची (Advocate Panel) नेमणूका करण्सासाठी खालील मुख्य अटीशर्तीवर अर्ज मागविणेत येत आहेत.

1. जेष्ठ विधिज्ञास (Sr. Advocate पदवी धारक LLB) महानगरपालिकेशी संबंधीत असलेल्या दिवाणी फौजदारी न्यायालयांची इ. सर्व प्रकरणे स्वतंत्रपणे हाताळण्याचा 15 वर्षांचा अनुभव व विधी शाखेचा पदव्युतर LLM पदवीधरास 15 वर्षांचा अनुभव.
2. कनिष्ठ विधिज्ञास (Jr. Advocate पदवीधारकास LLB) महानगरपालिकेशी संबंधीत असलेल्या दिवाणी, फौजदारी न्यायालयांची इ. सर्व प्रकरणे स्वतंत्ररित्या हाताळण्याचा 7 ते 10 वर्षांचा अनुभव व विधी शाखेच्या पदव्युत्तर पदवी धारकास (LLM) 7 ते 10 वर्षांचा अनुभव असावा.
3. विधीज्ञांचे /वकीलांचे स्वत:चे कार्यालय, दुरध्वनी व सहाय्यक कर्मचारी यासह अद्यायावत असले पाहीजे.
4. विशिष्ट विषयात अथवा न्यायालयीन प्रकरणांत विशेष अनुभव असल्यास तसे आवर्जुन नमूद करावे
   a. ( उदा. कामगार कायदे, भूसंपादन प्रकरणे इ.)
5. मा. उच्च नयायालातील व मा. जिल्हा न्यायालयातील विधिज्ञांकरीता याचिका / दावे / सिव्हील / क्रिमिनल /
   a. रिव्हिजन / अपील इ. प्रकरणांचा समावेश असेल.
6. मा. उच्च न्यायालयात तीन जेष्ठ विधिज्ञ व तीन कनिष्ठ विधिज्ञाची पॅनलवर नियुक्ती करणे आहे.
7. मा. जिल्हा न्यायालय क्रिमिनलसाठी 2, सिव्हिलसाठी 4, कामगार / औद्योगिक न्यायालयासाठी 2, .
8. सोबत शैक्षणिक पात्रता तसेच एनरॉलमेंट सर्टिफिकेट पॅनकार्ड / आधारकार्ड इ. जोडणे आवश्यक आहे.
9. अटी-शर्ती मध्ये पुर्णत: बदल करणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार आयुक्त यांचेकडे राखीव असतील.

**Sd/-**
**आयुक्त,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# अर्जाचा नमुना

1) **अर्जदाराचे संपूर्ण नांव**

| अर्जदाराचे संपूर्ण नांव | आडनाव | नाव | वडिलांचे / पतीचे नांव |
|---|---|---|---|
| मराठी | | | |
| इंग्रजी | | | |

2) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता.........................................................................................................................................................

...............................................................................................................................................................................

3) दूरध्वनी क्रमांक, दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक ...................................................................................................

4) जन्म तारीख (अंकात व अक्षरात )...............................................................................................................................

5) जाहिरातीचे दिनांकास वय - .......................वर्ष- ............................ महिने-........................................ दिवस ....................................

6) लिंग :- पुरुष / महिला

7) अवगत असलेल्या भाषा :- मराठी / हिंन्दी / इंग्रजी

08)शैक्षणिक अर्हता :-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव विद्यालय/ महाविद्यालय | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| पदवी | | | |
| विधी पदवी | | | |
| पदव्युत्तर | | | |
| संगणकीय ज्ञान | | | |
| इतर | | | |

**09) अर्जदाराची इतर माहिती**

अ)सनद घेतल्याचा दिनांक –

ब) उमेदवाराने अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय /नाही

क) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव (मा.उच्च् न्यायालय/ मा. जिल्हा न्यायालय) | याचिकांचे दाव्यांचे प्रकार | याचिका /दाव्यांची संख्या | वकीली अनुभव वर्षे |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

10) अर्जदाराविरुध्द् यापूर्वी कोणताही दखलपात्र अथवा अदखलपात्र गुन्हा दाखल आहे का ? होय / नाही

11) मा.जिल्हा न्यायालयाकरीता अर्ज करावयाचा झालेस त्याचा स्पष्ट् उल्लेख लिफाफ्यावर करणे आवश्यक आहे जसे -दिवाणी न्यायालय , फौजदारी न्यायालय, कामगार /औद्योगिक न्यायालय , ग्राहकमंच , अधिक्षक भूमी अभिलेख, विभागीय आयुक्त्, कामगार आयुक्त् इ. करीता कामाचा अनुभव.

12) मा. उच्च न्यायालया करीता अर्ज करावयाचा झालेस त्याचा स्पष्ट उल्लेख अर्ज व लिफाफ्यावर टाकणे आवश्यक आहे जसे - उच्च् न्यायालय मुंबई येथील WP, PIL इ.,वक्फ बोर्ड ,नागपूर खंडपीठ , स्लम ट्रिब्यूनल, बांद्रा मुंबई, Micro & Small Enterprises Fasciliation Council, ठाणे, मुंबई , नॅशनल ह्युमन राईट्स कमिशन मुंबई इ.करीता कामाचा अनुभव.

<u>अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी. श्री. / सौ/ कु.......................................................................................................... या द्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो / करते की, वरील माहिती जाणिपूर्वक तसेच विश्वास पूर्वक दिले असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानूसार व शैक्षणिक अर्हतानूसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चूकीची असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील व त्या बाबतीत माझ्या विरुध्द् कायदेशीर कार्यवाहीस मी प्राप्त राहील. तसेच नियुक्ती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेल.

ठिकाण -

अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक - / /2021 अर्जदाराचे नांव

..................................................................

सोबत – अर्जात नमूद केलेल्या प्रमाण पत्रांच्या प्रमाणीत केलेल्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.

## - अटी व शर्ती -

1. मा. जिल्हा न्यायालय व कामगार / औद्यो. न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ इ. प्रकारचे विविध न्यायालयकरीता नियुक्त वकिलांकरीता वकील फी मध्ये दाव्याचा अनुषंगीक खर्च, म्हणजेच टायपिंग झेरॉक्स कोर्ट फी स्टँम्प, निकाल पत्राच्या 2 प्रती व प्रोसेस फी इ. अंतर्भुत असेल.

2. नाशिक महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात वेळोवेळी आवश्यकतेनुसार न्यायालयीन कामकाजाबाबत आयोजित केलेल्या बैठकीस वकीलांनी उपस्थित रहावे.

3. नाशिक महानगरपालिकेच्या हिताचे विरुध्द कोणत्याही प्रकरणात / दाव्यात काम करता येणार नाही. तसे मनपास आढळून आल्यास आपली नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

4. आपले कामकाज समाधानकारक आढळून न आल्यास आपली पॅनल वरील नियुक्ती मुदत पुर्व रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे, तसेच आपली वकिल पॅनलवर फेरनियुक्ती न झाल्यास आपल्याकडे देण्यात आलेले दावे हे जर इतर पॅनल वकिलांकडे वर्ग करण्यात आले तर त्याबाबत कोणतीही फी अथवा नुकसान भरपाई देय होणार नाही.

5. जिल्हा न्यायालयाकरीता सर्व कायदेसल्लागार यांनी नाशिक महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजात आवश्यकते नुसार करारनामे, मसुदा तयार करणे, करारनामा मसुदा तपासणे ( खरेदीखत तयार करणे, नोंदविणेसाठी सहकार्य करावे ) इत्यादी कामे करावे लागतील. तसेच महत्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी मनपा मुख्यालयात उपस्थित राहावे लागेल.

6. सर्व कामांकरीता वकिलांनी विविध नस्तीवर दिलेला अभिप्राय/ कायदे विषयक सल्ल्याबाबत देयक सादर करते वेळी त्या बाबतचा सविस्तर तपशिल दिल्यावरच देयक अदा केले जाईल.

7. दाव्याचा निकाल मनपा विरुध्द लागल्यास त्याबाबत त्वरीत संबधीत विभागास कळविण्याची जबाबदारी आपली राहील. तसेच या निकाला विरूध्द विभागाने अपिल करावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करावे.

8. दाव्याच्या अंतिम निकालानंतर निकालाच्या प्रती बिल सोबत सादर केल्यानंतरच वकील फी अदा करणेत येईल.

9. मनाई हुकूम/दाव्याचे अंतिम निकालानंतर त्वरीत नकलेसाठी अर्ज देण्यात यावा व नक्कल प्राप्त झाल्यानंतर विनाविलंब मुख्यालयात पाठविण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी.

10. दाव्याचे कामकाजामध्ये मनपा विधी विभागामार्फत मनपाच्या संबंधीत वकीलांना वकील पत्र,आलेली दाव्याची प्रत पुरविणेत येईल. विधी विभागामार्फत संबंधीत खाते प्रमुख यांना अवगत करणेत येईल.

11. नाशिक महानगरपालिका वकील पॅनलचे कामकाजावर उप-आयुक्त अथवा समकक्ष खातेप्रमुख यांचे नियंत्रण राहील. याबाबत आवश्यक त्या सुचना वकील पत्र व आदेश देणेचे अधिकार त्यांना राहतील.

12. नाशिक महानगरपालिकेच्या ज्या विभागाशी केस निगडित असेल त्या खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांचेशी भ्रमणध्वनी / दुरध्वनी / ई-मेल व्दारे संपर्क संबधित वकिलांनी ठेवावा व सदर दाव्याबाबत पुर्वसुचना संबधीत खाते प्रमुख/विभाग प्रमुख यांना दयाव्यात. प्रतिज्ञापत्र करते वेळी अधिकारी / कर्मचारी यांना सहकार्य करावे.

13. दाव्याच्या तारखेबाबत वकिलांनी ज्या विभागाची केस निगडित असेल त्या विभागास वेळोवेळी कळवावे व आवश्यक कागदपत्रे मागवून घ्यावेत

14. नाशिक मनपा पॅनल वरील वकीलांनी ऐकमेकात समन्वय ठेवावा. जुन्या वकीलांकडे असलेले दावे ज्या नविन वकीलांकडे मा. आयुक्त सो. यांचे आदेशान्वये वर्ग करण्यात येतील अशा दाव्यातील जुन्या वकीलांनी NOC देवुन त्यांनी सदर दावे नाशिक मनपाच्या वतीने पुढे चालविणार असल्याचे मा. कोर्टास अवगत करावे परंतू वर्ग केलेल्या दाव्यांची जुन्या वकीलांना वकील फी अदा केली जाणार नाही.

15. वर्ष संपल्यानंतर आपलेकडे वर्षाअखेर शिल्लक, त्या वर्षात वर्ग केलेले दावे, त्या वर्षात निकाली दावे, त्या वर्षात मनपा बाजूने व विरुध्द लागलेले निकाल, अशंत: निकाल व वर्षा अखेर शिल्लक दावे अशा प्रकारची एकत्रित माहिती प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या अखेर पर्यंत विनाविलंब विधी विभागात सादर करावी.

16. दाव्यांच्या वाटपा बाबत व वकील पत्र देणे बाबत मा.आयुक्त सो. यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास /खातेप्रमुखास अधिकार राहतील. तथापी याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त सो. यांना राहतील.

17. जर चुकून वकील फी जास्त अदा झाल्यास, जादा अदा झालेली आक्षेपित रक्कम त्वरीत भरणे अथवा पुढील बिलातुन वजा केली जाईल.

18. वकील फी बाबत नियुक्ती नंतर वकील फी इ. बाबत आदेश देणेत येतील.

**अर्ज करण्यावी पध्द्त**

1) जेष्ठ विधिज्ञ व कनिष्ठ विधिज्ञ या पदासाठी करावयाचा अर्ज आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक 422 002 यांचे कार्यालयात किंवा पोष्टाने दिनांक- 01/10/2021 ते दिनांक – 20/10/2021 पर्यंत 10.00 ते 16.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

2) अर्जाचा नमूना सोबत जोडला आहे. सदर अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूस ठळक अक्षरात व मा. उच्च न्यायालय / मा. जिल्हा न्यायालयात वकील पॅनल करीता अर्ज असे नमूद करावे.

3). या कार्यालयात दिनांक 20/10/2021 रोजी 18.00 वाजेनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत तसेच पोष्टाने दिनांक - २२/10 /2021 पर्यंत 18.00 वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

4). अर्जांचा नमूना www.nmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमूना डाऊनलोड करुन अर्ज परिपुर्णरित्या भरावा. अपुर्ण भरलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.